महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
मुंबई विभागीय मंडळ,वाशी,नवी मुंबई-४०० ७०३.
M. S. Board Of Secondary And Higher Secondary Education,
Mumbai Divisional Board, Vashi, Navi Mumbai-400 703.

क्र.मुंविमं/उ.मा.प्रात्य./ऑनलाईन/३०४/8020
नवी मुंबई-४००७०३.
दिनांक : 11 / 03 /२०२३

प्रति,

प्राचार्य,
मुंबई विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेतील
आय.टी. विषय असलेले सर्व कनिष्ठ महाविद्यालय

**विषय–** इ. १२ वी मार्च २०२३ परीक्षेसाठी माहिती तंत्रज्ञान (आय.टी.) विषयाची मान्यता नसतांना विषय घेतला आहे, तसेच आय.टी. विषयास मान्यतेपेक्षा जास्त विदयार्थी संख्या असलेल्या कनिष्ठ महाविद्यालयांसाठी आवश्यक सूचना.

उपरोक्त विषयांस अनुसरून कळविण्यात येते की **मुंबई विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेतील फेब्रुवारी-मार्च २०२३ ची उच्च माध्यमिक** प्रमाणपत्र परीक्षा (इ. १२ वी) च्या **माहिती तंत्रज्ञान** (IT) विषयाची ऑनलाईन परीक्षा दिनांक २३, २४ व २५ मार्च रोजी आहे. त्या परीक्षेसाठी आवश्यक असणारे माहिती तंत्रज्ञान विषयाचे गोपनीय साहित्याचे (सी.डी.,पासवर्ड) खालील तारखांना वाटप करण्यात येणार आहे.

**गोपनीय साहित्य मंडळ कार्यालयातून स्विकृत करण्याच्या तारखा पुढीलप्रमाणे दृ**

| | | |
|---|---|---|
| दिनांक १३/०३/२३ वेळ सकाळी ११ते ५ | मंडळ कार्यालय | जिल्हा–मुंबई ३२व मुंबई उपनगर ३३ |
| दिनांक १४/०३/२३ वेळ सकाळी ११ते ५ | मंडळ कार्यालय | जिल्हा– ठाणे १६ व रायगड १७ |
| दिनांक १५/०३/२३ वेळ सकाळी ११ते ५ | मंडळ कार्यालय | जिल्हा– मुंबई ३१ व पालघर १८ |

१) सदर सी.डी. पासवर्ड घेतांना संबंधीत मुख्याध्यापक/प्राचार्य यांनी सांक्षाकित केलेले माहिती तंत्रज्ञान विषया मान्यतेचे मंडळाचे मान्यता पत्र सादर करणे आवश्यक आहे.

२) ज्या कनिष्ठ महाविद्यालयांनी महिती तंत्रज्ञान विषयाची नवीन मान्यता/अतिरीक्त तुकडी मान्यता नसतांना विदयार्थी प्रविष्ठ केलेले आहे. अशा कनिष्ठ महाविद्यालयांनी मंडळाने विहित केलेले दंड शुल्क भरावे.

३) माहिती तंत्रज्ञान (आय.टी.) विषयाची मान्यता नसतांना विषय घेतला आहे, तसेच मंडळ मान्यतेपेक्षा (क्षमतेपेक्षा) जास्त विदयार्थी प्रविष्ठ केले आहे. अशा कनिष्ठ महाविद्यालयानी राज्य मंडळाचे पत्र क्र. रामम/ परीक्षा–३/४७०४ दिनांक ०८/०८/२०१६ च्या पत्राप्रमाणे दंडाची रक्कम प्रती विद्यार्थी रूपये ५००/– तसेच कनिष्ठ महाविद्यालयांना रूपये १०००/– या प्रमाणे मंडळाच्या खात्यात बॅक ऑफ इंडियाच्या चलनाने दंडाची रक्कम भरण्यात यावी. **चलनाने रक्कम भरतांना चलनातील ६५ क्रमांकाचे हेड मध्ये आय.टी. विषयाचा दंड असे नमूद करून दंड भरावे.**

जे कनिष्ठ महाविद्यालय गोपनीय साहित्य घेण्यापूर्वी वरील कार्यवाही करणार नाही अशा कनिष्ठ महाविद्यालयांना सी.डी. व पासवर्ड मिळणार नाही याची नोंद घ्यावी. त्यामुळे विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहिल्यास तसेच विदयार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाल्यास संबंधित कनिष्ठ महाविद्यालय व मुख्याध्यापक/प्राचार्य सर्वस्वी जबाबदार राहतील याची नोंद घ्यावी.

(डॉ. सुभाष बोरसे)
**विभागीय सचिव,**
**मुंबई विभागीय मंडळ, वाशी,**
**नवी मुंबई-४०० ७०३.**

**टिप-** फेब्रु/मार्च २०२३ माहिती तंत्रज्ञान (आय.टी.)विषयाचे गोपनीय साहित्य स्विकारतांना खालील माहिती कनिष्ठ महाविद्यालयांच्या लेटरहेडवर विषय मान्यतेच्या साक्षांकित प्रतीस मंडळात जमा करणे आवश्यक आहे.

कनिष्ठ महाविद्यालयाचे नाव –

सांकेतांक क्रमांक–

| आय.टी. विषय मान्यता असलेल्या तुकडयांची संख्या | | | | फेब्र/मार्च२०२३साठी आय.टी. विषयास प्रविष्ठ विदयार्थी संख्या | | | | आय.टी. विषयास मान्यता नसतांना अतिरिक्त प्रविष्ठ विद्यार्थी संख्या | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| कला | वाणिज्य | विज्ञान | संयुक्त | कला | वाणिज्य | विज्ञान | संयुक्त | कला | वाणिज्य | विज्ञान | संयुक्त |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |

मुख्याध्यापक/प्राचार्य
स्वाक्षरी व शिक्का